हिंदुस्थान

वलयांकित

बुधवार, दि. १३ फेब्रुवारी २०१९

रॅपर्सचा संघर्ष रुपेरी पडद्यावर

[illegible]

'बाफ्ता'त 'रोमा' आणि 'द फेवरिट'ची धूम

[illegible]

तापसीचा नवा चित्रपट

[illegible]

सोनम कपूरच्या पदरी अपयश

[illegible]

मी आनंदी...

[illegible]

प्रेरणादायी 'आनंदी गोपाळ'

[illegible]

[illegible]

प्रादेशिक चित्रपटांकडून हिंदी मालिकांकडे

[illegible]



[illegible]

सोशल मीडियाची गुलाम नाही!

[illegible]

हिंदुस्थान
वलयांकित
movie CLUB
बुधवार, दि. १३ फेब्रुवारी २०१९

रुचकर शेजवान चटणी

रसगंधा

त्याच त्याच चवीच्या चटण्या खाऊन कंटाळा आला असेल तर शेजवान चटणी करुन पहायला काहीच हरकत नाही. ही चटणी बरेच दिवस टिकते. चायनीज पदार्थ बनवताना ती वापरता येते. चला तर मग, कृती जाणून घेऊ या.

सामग्री: १०-१२ सुकलेल्या लाल मिरच्या, लसणाचे दोन गड्डे, सात-आठ लसणाच्या पाकळ्या (बारीक चिरुन), एक कांदा(बारीक चिरलेला), दोन इंच आलं (किसलेलं), दोन हिरव्या मिरच्या (बारीक चिरलेल्या), चवीनुसार मीठ, एक चमचा कॉर्नफ्लॉवर, तेल इत्यादी.

कृती: सर्वप्रथम लसूण सोलून लाल मिरच्यांबरोबर शिजत ठेवावा. चांगला शिजल्यानंतर पाणी काढावं मात्र फेकून देऊ नये. आता शिजलेल्या मिरच्या आणि लसणाची मिक्सरमध्ये बारीक पेस्ट करुन घ्यावी. दुसरीकडे एका कढईत दोन चमचे तेल घालावं आणि चांगलं गरम करावं. नंतर त्यात बारीक चिरलेला लसूण, आलं आणि हिरवी मिरचीचे तुकडे घालून परतून घ्यावे. आता यात चिरलेला कांदा गुलाबी रंगावर परतून घ्यावा. लाल रंग येण्यासाठी चमचाभर काश्मिरी मिरची पूड घातली तरी हरकत नाही. आता यात लसूण आणि मिरचीची पेस्ट घालून मिश्रण पाच मिनिटे शिजवून घ्यावं. चांगलं शिजण्यासाठी त्यात गाळलेलं पाणी मिसळावं. मिश्रणाला उकळी आल्यानंतर चमचाभर कॉर्नफ्लॉवर घालावं आणि पुन्हा दोन मिनिटे शिजवावं. पूर्ण गार झाल्यावर ही चटणी हवाबंद बरणीत भरावी आणि फ्रीजमध्ये ठेवावी.

सहजीवनाला संगीतस्पर्श

मनीमानसी

अश्विनी अभ्यंकर

कलेच्या प्रांगणात स्वच्छंद विहरणाऱ्या, साधनेत रममाण होणाऱ्या, कलेप्रती समर्पित आयुष्य जगणाऱ्या कलाकाराबरोबर संसार करणं ही एकीकडे तारेवरची कसरत असली तरी हे सहजीवन खूप सुंदर असतं. यानिमित्ताने कलाकाराचा हात हाती घेऊन आपल्यालाही त्या रम्य नगरीची सफर घडते. संजीव अभ्यंकर या प्रथितयश गायकाची पत्नी म्हणून वावरताना मी हा अनुभव घेते. अर्थात गायक असणाऱ्या पतीच्या आरोग्याची, त्याच्या गात्या गळ्याची काळजी घेणं हादेखील पत्नीधर्मातील एक महत्त्वाचा भाग ठरतो. संजीवला कायम आवाजाची काळजी घ्यावी लागते. या दृष्टीने आहारात काही गोष्टी प्रकर्षाने टाळाव्या लागतात. एखाद्या वेळी आम्हाला काही चटपटीत खायची इच्छा होते पण कार्यक्रम असल्यास संजीव त्याला नकार देतो. सुरुवातीला तर बरेचदा हा आमच्यातला वादाचा मुद्दा असायचा. जवळपास पंधरा-वीस दिवस घराबाहेर असल्याने परतल्यानंतर त्याला विश्रांती हवी असायची, बाहेरचं खाल्ल्यामुळे उबग आलेला असायचा. अशा वेळी घरीच आराम करण्याचा आणि घरची पोळी-भाजी खाण्याचा त्याचा आग्रह असायचा. पण मला मात्र घरात राहून कंटाळा आलेला असायचा. यावरून वाद ठरलेला असायचा. पण नंतर नंतर आम्हीच हा प्रश्न सोडवला. आता बाहेर खाण्याची इच्छा झाल्यास मुली आणि मी हव्या त्या पदार्थांवर ताव मारतो आणि तो घरी आल्यावर जेवतो.

कलाकार एककल्ली असतो, आपल्याच विचाराच्या तंद्रीत असतो. मी अनेकदा याचा अनुभव घेतलाय. कधी कधी त्याच्या या स्वभावाचा खूप त्रासही होतो. एक छोटीशी गोष्ट सांगते, कुठेही बाहेर पडताना गाडी काढली की तो ठराविक रस्त्यानेच निघतो. भले त्याच्या विरुद्ध दिशेला जायचं असलं तरी तो त्याच रस्त्याने गाडी नेणार हे ठरलेलं... मग आपणच आपल्याला विरुद्ध दिशेला जायचंय, याची आठवण करून द्यायची आणि मग त्याने विसरभोळेपणाचा आव आणत गाडी वळवायची हे नित्याचं झालं आहे. नेहमीच घडत असल्यामुळे याचा खूप त्रास होतो. पण काही गोष्टी स्वीकारण्याशिवाय पर्याय नसतो. कामाच्या व्यस्ततेमुळे त्याला घरासाठी फारसा वेळ देता येत नाही हे वास्तव आहे. पण ही माझी तक्रार नाही. कोणत्याही यशस्वी पुरुषाच्या मागे स्त्री असते असं म्हणतात. यात त्या पुरुषाचा गौरव असतो त्याचप्रमाणे स्त्रीचाही गौरव असतो. म्हणूनच या गौरवाला पात्र ठरण्याचा माझा कसोशीचा प्रयत्न असतो.

त्या... हाडाच्या शिक्षिका

मानिनी

पालकांनंतर मुलांच्या जडणघडणीत योगदार देणारी अजून एक व्यक्ती म्हणजे गुरू किंवा शिक्षक. शिक्षक समाज घडवतात असं म्हणल्यास वावगं ठरू नये. गुरूने दिलेला हा ज्ञानरूपी वसा शिष्य पुढे चालवतात. पण केरळमधल्या एक शिक्षिका शिक्षणाचा वसा पुढे नेत आहेत. के.आर. उषाकुमारी असं त्यांचं नाव. आदिवासी भागातल्या शाळेत जाण्यासाठी त्या दोन तास पायपीट करतात.

के. आर. उषाकुमारी म्हणजे हाडाच्या शिक्षिका. शिक्षण देण्याची तळमळ काय असते हे त्यांच्याकडे पाहून कळतं. आदिवासी भागातल्या शाळेत जाण्यासाठी त्यांना दोन तास प्रवास करावा लागतो. हा प्रवास साधासोपा नसतो. हत्ती आणि बिबट्या मुक्तपणे फिरत असलेल्या जंगलातून त्यांना पायपीट करावी लागते. आदिवासी मुलांना शिक्षणाची गोडी लागावी, त्यांनी आयुष्यात काहीतरी करावं यासाठी त्या झटत आहेत. केरळमधल्या थिरूअनंतपुरम जिल्ह्यातल्या अंबुरी गावच्या रहिवासी असलेल्या उषाकुमारी डोंगराळ भाग आणि जंगलातून वाट काढत शाळेत पोहोचतात.

उषाकुमरींचा प्रवास सकाळी ७.३० ला सुरू होतो. आपल्या स्कूटीवरून त्या कुंबिकल काडावूला जातात. तिथून बोटीने त्या नदी पार करतात. हा प्रवास इथे संपत नाही तर तो नव्याने सुरू होतो. दोन किलोमीटर चालल्यानंतर डोंगरदऱ्यांचा भाग सुरू होतो. घनदाट जंगलातून त्या प्रवास करतात. या जंगलात जंगली हत्ती, बिबटे मुक्तपणे फिरत असतात. पण त्या कशाचीही पर्वा करत नाहीत. या प्रवासात त्यांच्या हाती फक्त एक काठी असते. काही विद्यार्थी त्यांची सोबत करतात.अखेर त्या कुन्नाथुमालातल्या आदिवासी भागातल्या शाळेत पोहोचतात. या भागात कन्नी आदिवासी समुदाय राहतो.

अगस्त्य इगा अध्यापका विद्यायला असं या शाळेचं नाव. केरळमधल्या नेयार वन्यजीव अभयारण्यातल्या १८६८ मीटर उंच टेकडीवर ही शाळा वसली आहे. अत्यंत धोकादायक अशा रस्त्यानी जाणाऱ्या उषाकुमारी गेल्या १६ वर्षांपासून अध्यापनाचं काम करत आहेत. पण एवढ्या प्रदीर्घ काळात त्या शाळेत कधीच उशीरा पोहोचलेल्या नाहीत. सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत सुरू असणाऱ्या या शाळेतल्या त्या एकमेव शिक्षिका असून भाषा, गणित, विज्ञान असे सगळे विषय त्या शिकवतात. पहिली ते चौथीच्या १४ मुलांच्या गटाला त्या शिकवतात. १९९९ मध्ये केरळ सरकारने थिरूअनंतपुरमच्या आदिवासी भागात एकल शिक्षक शाळा सुरू केल्या. पण त्याआधीही काही भागात अशी संकल्पना राबवण्यात आल्याचं उषाकुमारी सांगतात. त्या फक्त शिक्षिका नाहीत तर शाळा आणि विद्यार्थ्यांच्या इतर गरजांकडेही त्या कटाक्षाने लक्ष देतात. मुलांना पोषक आहार मिळावा यासाठी त्या प्रयत्न करतात. प्रसंगी स्वतःच्या खिशातून पैसे देतात. त्यांच्या या कार्याचा विविध पुरस्कारांनी गौरव झाला आहे. बरेच महिने पगार न मिळूनही त्यांनी कामात कसूर केलेली नाही. कोणत्याही मोबदल्याशिवाय झटणाऱ्या उषाकुमारी खऱ्या अर्थाने आदर्श शिक्षिका आहेत.

स्मार्ट शॉपिंग

डिओ खरेदी करताना...

काही दिवसात उन्हाळा सुरू होईल. मग डिओडरंटची गरज लागेल. डिओ खरेदी करताना त्यातले घटक तपासून घ्या. बऱ्याच डिओंमध्ये अत्यंत घातक रसायनं असतात. यामुळे तुमची त्वचा काळी पडते, खाज सुटते. त्यामुळे नैसर्गिक घटक असलेले डिओ निवडा. डिओमध्ये अल्कोहोल नाही ना, याची खात्री करून घ्या. डिओ घेण्याआधी छोटी चाचणी करा. त्याचा सँपल पॅक मनगटावर शिंपडून बघा. यामुळे डोकेदुखी किंवा पुरळ उठण्यासारखी समस्या जाणवली नाही तरच तो खरेदी करा. खूप घाम येत असेल तर डिओचा काहीच उपयोग नाही. अशावेळी अँटी परस्पिरंट वापराला हवं.

हेअर केअर

लाभ कॉड लिव्हर ऑईलचे

गळक्या केसांसाठी कॉड लिव्हर ऑईलचा वापर करा. या तेलात ई, अ आणि ड ही जीवनसत्त्व असतात. केसांच्या वाढीसाठी आवश्यक अशा पोषक घटकांमुळे त्यांचा पोत सुधारतो. छान मऊ केस हवे असतील तर कॉड लिव्हर ऑईल नियमित लावा. पण अनेकींना याचा वास आवडत नाही. अशावेळी कॉड लिव्हर ऑईल सप्लिमेंट्सचा वापर करता येईल.

लाईफस्टाईल

बाळंतपणानंतर नैराश्य आलंय?

आई झाल्यानंतर अनेकींना नैराश्य येतं. याला बाळंतपणानंतरचं नैराश्य म्हणजे पोस्ट पार्टम डिप्रेशन म्हणतात. आई झाल्याचा आनंद साजऱ्या करणाऱ्या कोणत्याही महिलेला हा त्रास होऊ शकतो. तुम्हालाही उदास, हताश वाटत असेल तर तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्या. अशा नैराश्याकडे सहसा दुर्लक्ष होतं. पण योग्य उपचार आणि कौटुंबिक पाठिंब्याच्या जोरावर तुम्ही यातून बाहेर पडू शकता. या काळात आवडीच्या गोष्टी करा. छंद जोपासा, प्रेरणादायी पुस्तकांचं वाचन करा. सतत आनंदी राहण्याचा प्रयत्न करा.

लेअरिंग करा, ग्लॅमरस दिसा

स्टाईल स्टेटमेंट

मैत्रिणींनो, तुम्ही लेहंग्यावर फक्त दुपट्टा कॅरी करता का? जीन्सवर टॉप घातला की तुमचं भागतं का? या प्रश्नांची उत्तरं 'हो' असतील तर फॅशनच्या बाबतीत तुम्ही मागे आहात असंच म्हणावं लागेल. कारण जीन्स असो वा लेहंगा, प्रत्येक पेहराव इंडो-वेस्टर्न पद्धतीने कॅरी करण्याचा ट्रेंड सध्या बराच लोकप्रिय ठरतो आहे. यासाठी लेअरिंगचा फंडा वापरला जातो. बॉलिवूडमधल्या अभिनेत्रींकडून हा लूक कॅरी करण्याचे धडे घेता येतील.

✻ अंकिता लोखंडेने मध्यंतरी फॅशन डिझायनर कनिका कपूरने डिझाइन केलेला चिकनकारी कलेक्शनमधला पिवळ्या रंगाचा केप घातला होता. तिने व्हाईट टॉप आणि ब्लू जीन्सवर लेअरिंग म्हणून हा केप कॅरी केला. अशाप्रकारचा केस लेहंगा, साडी, स्कर्ट यापैकी कशावरही घालता येईल.

✻ सोहाअली खानने अनामिका खन्नाने डिझाईन केलेला श्रग लुंगी स्टाईल स्कर्ट आणि लाँग स्लीव्ह जॅकेटवर कॅरी केला. यामुळे ती अजूनच स्टायलिश दिसली. तुम्ही स्कर्ट आणि जॅकेट अशा लूकवर ट्रेंडी श्रग घालू शकता.

✻ करिश्मा तन्नाने साईड प्लेट लुंगी स्कर्टवर क्रॉप टॉप आणि पायघोळ श्रग घातला. या एका श्रगमुळे तिच्या लूकला चार चाँद लागले. असा श्रग तुम्ही कशावरही घालू शकता.

✻ डेझी शाहने डिझायनर शमिताशाचा लेहंगा-चोली कॅरी केला होता. त्यावर दुपट्टयाऐवजी तिने पायघोळ जॅकेट घातलं. यामुळे तिला हटके इंडो-वेस्टर्न लूक मिळाला.

पेहराव पाश्चिमात्य असो किंवा भारतीय, लेअरिंगचा हा फंडा तुमच्या सिंपल लूकलाही एका क्षणात नवं ग्लॅमर देऊ शकतो.

फॉर ग्लोइंग स्कीन

सौंदर्यसाधना

वाढत्या वयाच्या खुणा सर्वात आधी चेहऱ्यावर दिसू लागतात. त्वचेवर सुरकुत्या पडणं, चेहरा काळपट दिसणं असं बरंच काही होतं. साधारणपणे तिशीनंतर चेहरा निस्तेज दिसू लागतो. म्हणूनच मग महिला महागड्या अँटी एजिंग क्रीम्सचा वापर करतात. यातल्या रसायनांमुळे त्वचेचा पोत सुधारण्याऐवजी बिघडतो. त्यामुळे अशा क्रीम्सऐवजी नैसर्गिक घटकांचा वापर करून त्वचेचं तारूण्य टिकवता येतं. हे घटक कोणते? त्यांचा कसा वापर करायचा, याविषयी...

✻ जोजोबा ऑईल मॉईश्चरायझरचं काम करतं. याच्या नियमित वापराने त्वचेवरच्या सुरकुत्या, फाईन लाईन्स कमी होतात. वाढत्या वयामुळे त्वचा कोरडी आणि सैल होते. पण जोजोबा तेलातले नैसर्गिक घटक त्वचेतल्या टिश्यूंना दुरूस्त करून तारूण्य टिकवून ठेवतात.

✻ डाळिंबाचे लालचुटुक दाणे जितके मधुर तितकेच आरोग्यदायी असतात. यातल्या अँटी ऑक्सिडंट्समुळे शरीरातल्या फ्री रॅडिकल्सचं प्रमाण कमी होतं. तसंच अँटी एजिंग गुणधर्मामुळे डाळिंब त्वचेचा पोत टिकवून ठेवतं. सैल पडलेल्या त्वचेला नवी उभारी देतं. म्हणून आहारात डाळिंबाचा समावेश करावा. तसंच याचा फेसपॅक किंवा रस चेहऱ्याला लावता येईल.

✻ रेटिनॉल्समुळे त्वचेतल्या कोलेजन या घटकाच्या निर्मितीला वेग येतो. यामुळे फाईन लाईन्स तसंच सुरकुत्या कमी होतात. याच्या नियमित वापराने त्वचेत नव्या रक्तपेशींची निर्मिती होते. यामुळे चेहरा उजळतो. वयानुसार चेहऱ्यावर पडणारे डाग, चट्टे यामुळे रेटिनॉल्समुळे कमी होतात.

साधारण तीन ते सहा महिने याचा नियमित वापर करायला हवा.

✻ ग्रीन टीच्या नियमित सेवनामुळे त्वचा उजळते. यात बी १२ आणि ई ही जीवनसत्त्व भरपूर प्रमाणात असतात. बी १२ मुळे त्वचेचा तजेला टिकून राहतो. तर ई जीवनसत्त्व नव्या पेशींच्या निर्मितीला चालना देतं. यामुळे त्वचा मुलायम बनते. त्यामुळे दिवसातून दोन वेळा ग्रीन टी प्यावा.

कौशल्य पणाला लाव

समुपदेशन

एका लहान गावात लहानाची मोठी झालेली आणि लग्नानंतर परदेशात वास्तव्यास असणारी मी पस्तीस वर्षीय युवती असून उच्चशिक्षित आहे. इथे मलाही चांगला स्कोप आहे. त्यामुळे करिअर घडवण्याच्या दृष्टीने मी काही ठिकाणी रेझ्युमे पाठवला होता. त्यातील एका कंपनीकडून चांगली ऑफरही आली आहे. पण तो जॉब वेगळ्या शहरात आहे. दररोज अपडाऊन करणं शक्य नाही. पण माझ्यासाठी ही खूप चांगली संधी ठरु शकते. त्यामुळे मी हा जॉब करते, हे पतीला समजावण्याचा बराच प्रयत्न करुन पाहिला, पण त्याला आम्ही दोघांनी वेगवेगळ्या शहरात राहणं मान्य नाही. काय करु काही कळत नाहीये.

– मैत्रिणी, जग हे एक खेडं बनलेलं असताना कामानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी रहावं लागणं ही जोडप्यांची कथा आणि व्यथा आहे. पण सहमतीने ते या समस्येवर तोडगा काढतात आणि प्रगती साधतात. कदाचित या बदलत्या परिस्थितीला कसं सामोरं जावं हे तुझ्या पतीला समजत नसेल. त्यामुळे त्याला विश्वासात घेऊन हे समजावून सांग. पाच दिवस नोकरीच्या शहरात राहून विकेंडला तुम्ही एकत्र येऊ शकता. वर्क फ्रॉम होम अथवा फ्रिलान्सचा काही पर्याय आहे का याचीही तू चौकशी करु शकतेस.

तुला त्या संधीचा खूपच लाभ होणार असेल तर पतीच्या विरोधाला कसं सामोरं जायचं आणि त्याचं मन कसं वळवायचं हे तुझं कौशल्य आहे.

'मस्ट हॅव' ॲप्स

व्हा टेक्नो सॅव्ही

फाईल ट्रान्सफर करण्यापासून डाटा बॅकअप घेण्यापर्यंतची कामं एका क्लिकवर होऊ शकतात. तुम्हाला यासाठी फक्त काही ॲप्स डाउनलोड करावी लागतली. या ॲप्समुळे तुमची बरीच कामं अगदी झटपट होतील. वेळेची बचत करणाऱ्या या ॲप्सविषयी...

✻ 'इन्स्ट लाईफ' हा मोबाईल गेम आहे. पण यात शूटिंग किंवा रेसिंगसारखं काहीही नाही. या गेमच्या मदतीने तुम्ही आयुष्यातले निर्णय घेऊ शकता. यात तुम्हाला एक व्यक्तिरेखा निवडायची आहे. आयुष्यातल्या कोणत्याही टप्प्यावर आलेली अडचण सोडवण्यासाठी या गेमची मदत होईल. तुम्हाला इथे वेगवेगळे पर्याय मिळतील. यापैकी योग्य पर्याय निवडून अडचणींवर मात करता येईल.

✻ स्नॅपसीड हे फोटोग्राफी ॲप आहे. ते डाउनलोड केल्यावर तुम्ही फोनमधला कोणातही फोटो एडिट करू शकता.सोशल मिडियावर शेअर करण्यासाठी इमेजचा आकार कमी करता येईल. तसंच इतर बदल करण्याची सोयही यात आहे.

✻ ई मेलच्या इनबॉक्समध्ये बरेच प्रमोशनल आणि स्पॅम मेल येऊन पडतात. या मेल्सच्या गर्दी महत्त्वाचे मेल्स सापडत नाहीत. 'टेम्प मेल' हे ॲप तुमच्या इनबॉक्समधले नको असलेले मेल डिलिट करतं. टेम्प मेलमुळे तुमचा इनबॉक्स कायम क्लीन राहिल. इतकंच नाही तर हे ॲप फिशिंग ई मेल्स तसंच स्पॅमर्सपासून तुमच्या ई मेलला सुरक्षित ठेवतं.

✻ सोशल मिडिया, बॅंकिंग ॲप्स वापरण्यासाठी युजर नेम आपण पासवर्ड लागतात. एकापेक्षा जास्त पासवर्ड आपल्या लक्षात राहात नाहीत. अशावेळी 'लास्ट पास' ॲप तुमच्या कामी येईल. या ॲपमध्ये तुम्ही सगळे पासवर्ड आणि युजरनेम सेव्ह करू शकता. त्यामुळे तुम्हाला एकाच ठिकाणी सगळे पासवर्ड मिळतील. यात पासवर्ड आणि युजर नेम एन्क्रिप्टेड पद्धतीने सेव्ह होत असल्याने सुरक्षित राहतात.

करा व्हर्च्युअल इंटर्नशीप

स्कील डेव्हलपमेंट

घरच्या जबाबदाऱ्या, मुलांचं पालनपोषण अशा अनेक कारणांमुळे महिलांना करीअरमधून ब्रेक घ्यावा लागतो. करीअरमध्ये नवी उंची गाठत असताना अचानक बसलेली खीळ महिलांचा आत्मविश्वास डळमळीत करते. कौटुंबिक अडचण संपल्यावर, मुलं थोडी मोठी झाल्यावर त्यांना पुन्हा करीअर सुरू करायचं असतं. पण मधल्या काळात स्वतःला अपडेट ठेवण्यासाठी, आत्मविश्वास जपण्यासाठी तुम्ही 'व्हर्च्युअल इंटरर्नशीप' करू शकता.

ही इंटर्नशीप म्हणजे नेमकं काय तर २ ते ६ महिन्यांच्या कालावधीसाठी मिळणारा कामाचा अनुभव. ही इंटर्नशीप घरबसल्या अगदी सहज करता येते. त्यामुळे काम सोडल्यामुळे तुम्हाला नैराश्य येणार नाही. आपल्या वेळेनुसार तुम्ही कामात मन गुंतवू शकाल. व्हर्च्युअल इंटर्नशीप करताना तुम्ही तुमच्या वेळेनुसार काम करू शकता. तसंच या काळात कार्यालयात उपस्थित राहावं लागत नाही.

अनेक कंपन्या कर्मचाऱ्यांना घरून काम करण्याची सुविधा देऊ शकत नाहीत. त्यामुळे महिलांना नाईलाजाने काम सोडावं लागतं. अशा परिस्थितीत व्हर्च्युअल इंटर्नशीपच्या माध्यमातून तुम्ही कामाशी जोडलेल्या राहू शकता. तसंच ब्रेकनंतर नोकरी मिळवतानाही हा अनुभव कामी येतो.

व्हर्च्युअल इंटर्नशीपमुळे तुम्ही विविध क्षेत्रात घरबसल्या मुशाफिरी करू शकता. गरज म्हणून नोकरी स्वीकारताना आपल्याला अनेकदा आवड, छंद बाजूला ठेवावे लागतात. पण पुन्हा काम सुरू करताना तुम्ही आपल्या छंदांना नवा आयाम देऊ शकता. नोकरी सोडल्यानंतर पगार बंद झाल्याने खर्चाचा ताळमेळ बसवणं कठीण जातं. पण बहुतांश व्हर्च्युअल इंटर्नशीप्स इंटर्नना स्टायपॅंड किंवा मानधन देतात. त्यामुळे तुम्ही आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी राहता.

ऑटो वर्ल्ड

‘क्विड’ नव्या रुपात

‘रेनॉ’ने भारतात ‘क्विड’चं नवं मॉडेल सादर केलं. यात सुरक्षा तसंच आरामदायी प्रवासाच्या दृष्टीने बरीच फीचर्स देण्यात आली आहेत. नव्या ‘क्विड’च्या प्रत्येक व्हर्जनमध्ये ‘अँटी लॉक ब्रेकिंग सिस्टिम’ तसंच एअर बॅग्जची सोय करण्यात आली असून ‘सीट बेल्ट रिमाइंडर’, ‘रिव्हर्स पार्किंग कॅमेरा’ आणि ‘ओव्हर स्पीड अलर्ट’मुळे ‘क्विड’मधला प्रवास अधिक सुरक्षित होईल. नव्या सोयी करूनही ‘रेनॉ’ने गाडीच्या किंमतीत कोणताही बदल केलेला नाही. ०.८ लीटर आणि १.० लीटर असे इंजिनचे दोन पर्यायही कंपनीने दिले आहेत.

कर्ज घेताय?

इथेही लक्ष द्या

वैयक्तिक कर्ज सहज उपलब्ध होत असल्याने तातडीची आर्थिक निकड भागवण्यासाठी हा पर्याय निवडला जातो. पण कर्ज घेण्याच्या नादात काही गोष्टींकडे लक्ष दिलं जात नाही. अशा कर्जांचे व्याजदर प्रचंड असल्याने परतफेडीची क्षमता तपासूनच ते घ्यायला हवं. एकाच वेळी विविध बँकांकडून वैयक्तिक कर्जाची माहिती मिळवल्याने तुमचा ‘क्रेडिट स्कोअर’ कमी होतो. यामुळे भविष्यात कर्ज मिळवताना अडचणी येऊ शकतात. वैयक्तिक कर्जासंबंधीच्या नियम आणि अटींकडे केलेलं दुर्लक्षही महागात पडू शकतं.

गुंतवणूक

दहा वर्षांमध्ये व्हा कोट्यधीश!

पुढच्या दहा वर्षांमध्ये म्हणजे २०२९ पर्यंत एक कोटी रुपयांचा निधी जमवायचा असेल तर इक्विटी म्युच्युअल फंडांच्या सिप योजनेत गुंतवणूक करायला सुरूवात करा. महिना २० हजार रुपये गुंतवणूक करून तुम्ही हा निधी जमवू शकता. या गुंतवणुकीत दर वर्षी १५ टक्के वाढ करावी लागेल. २० हजार रुपये गुंतवणुकीला सुरूवात करून प्रत्येक वर्षी त्यात १५ टक्के वाढ केली तसंच या फंडांवर १५ टक्के दराने परतावा मिळाला तर २०२९ पर्यंत तुमच्याकडे ९५.५६ लाख रुपये जमा होतील. यासोबतच म्युच्युअल फंडात एकरकमी २७ लाख रुपये गुंतवण्याचा पर्यायही आहे. यावर १४ ते १६ टक्केदराने व्याज मिळालं तर पुढच्या दहा वर्षात एक कोटी रुपये निधी जमेल. दहा वर्षं किंवा त्यापेक्षा अधिक काळासाठीच्या गुंतवणुकीचं सतत मूल्यांकन करायला हवं. यासाठी आर्थिक सल्लागाराचीही मदत घेता येईल.

रीॲल्टी

व्यावसायिक मालमत्ता कात टाकतेय!

व्यावसायिक गाळ्यांनी आता कात टाकायला सुरूवात केली आहे. देशातल्या आयटी तसंच बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गरजा लक्षात घेऊन व्यावसायिक मालमत्ता क्षेत्रात सर्व सोयीसुविधांनी सुसज्ज ‘बिझनेस सेंटर्स’ तसंच ‘को वर्किंग स्पेस’ची संकल्पना दृढ होत आहे. आता कंपन्यांना या सुखसोयींसाठी पैसा खर्च करावा लागत नाही. म्हणूनच बऱ्याच कंपन्या भाड्याने जागा घेण्यावर भर देत आहेत. स्वयंचलित डोअर लॉक्सपासून ॲपवर आधारित बुकिंगपर्यंत तंत्रज्ञानाने सर्व काही साधलं आहे. त्यामुळे येत्या काळात कार्यालयांच्या जागा अशाच तंत्रज्ञानाने सुसज्ज असतील, अशी अपेक्षा आहे.

अशी दवडली संधी...

सध्या शेतकरी, मध्यमवर्ग, व्यापारी आदी समाजघटकांची सरकारप्रती नाराजी पहायला मिळत असल्यामुळे सरकारनं ताज्या अर्थसंकल्पात आणखी स्वप्नं पेरली. मात्र, मशागत न करता घाईघाईत घोषणांचा पाऊस पाडल्याने पिकापेक्षा तणच बहरून येण्याची चिन्हं आहेत. वित्तीय शिस्त मोडीत काढल्यामुळे तूट वाढण्याचाही धोका आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं पाच वर्षांमध्ये सहा अर्थसंकल्प सादर केले. गेल्या पाच वर्षांमध्ये शेतकऱ्यांना वेगवेगळी स्वप्नं दाखवली. उत्पन्न दुप्पट करण्याचं आमिष दाखवलं. प्रत्यक्षात त्यातलं काहीच झालं नाही. त्यामुळे उत्तर प्रदेशमधील पोटनिवडणुकीपासून शेतकरी या सरकारच्या विरोधात अंसतोष प्रकट करू लागले. हिंदी भाषिक पट्टा हा तर भाजपचा बालेकिल्ला. परंतु तिथेही भाजपला चांगलाच धडा मिळाला. याउलट, तेलंगणामध्ये शेतकऱ्यांच्या हितासाठी राबवलेल्या चांगल्या योजनांमुळे शेतकरी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्यामागे उभे राहिले. राहुल गांधी यांनी तीन राज्यांमध्ये जाहीर केलेल्या कर्जमाफीचा फायदा त्यांना निवडणुकीत मिळाला. खरं तर कर्जमाफी हा शेतकऱ्यांच्या समस्यांवरचा उपाय नाही. त्याऐवजी शेतकऱ्यांना पुरेसं भांडवल, शेतीमालावर प्रक्रिया, वेळेवर वीज, पाणी आणि योग्य भाव मिळाला तर कर्जमाफीची आवश्यकताच भासणार नाही; परंतु शेतकऱ्यांचं मूळ दुखणं बाजूला राहतं आणि मतदायी योजना आणून त्यांना स्वप्नांमध्ये गुंतवून ठेवलं जातं. आताही हंगामी अर्थसंकल्पात सरकारनं घोषणांचा पाऊस पाडला. दोन हेक्टरपर्यंत अल्पभूधारक शेती असलेल्या शेतकऱ्यांना दर वर्षी सहा हजार रुपये, त्याचबरोबर, किमान हमी भावाप्रमाणे मूल्य देण्यात येत आहे, असा दावा सरकारनं केला. परंतु बाजारातले शेतमालाचे भाव हमी भावापेक्षा कमी झाल्यास सरकारनं तो माल खरेदी करावा, अशी कायदेशीर तरतूद आहे, प्रत्यक्षात सरकारजवळ अशी सक्षम यंत्रणाच नाही. शासन २३ पिकांपैकी फक्त तीन-चार पिकांचीच खरेदी करतं, तीही पूर्ण नाही.

२०१६-२०१७ मध्ये सरकारने तुरीची ३३ टक्के, हरभरा १० टक्के आणि सोयाबीनची अर्धा टक्काच खरेदी केली. बाकी ९० टक्के माल शेतकऱ्यांना पडत्या भावानं विकावा लागला. हमी भावापेक्षा शेतमाल कमी दरात खरेदी केल्यास व्यापाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचा कायदा आहे. यापूर्वी काही ठिकाणी व्यापाऱ्यांना शिक्षाही झाली; परंतु या कायद्याची अंमलबजावणीच केली जात नाही. त्यावर सरकार काही करायला तयार नाही. हा अर्थसंकल्प ग्रामीण व कृषी क्षेत्रावर भर देणारा असल्याचं भासवण्यात अर्थमंत्री यशस्वी झाले असले तरी सातत्यानं दुष्काळाच्या छायेत असणाऱ्या शेतीसाठी जलसिंचन, कोरडवाहू शेती, सेंद्रिय शेती, दीडपट हमीभाव, शेतमाल साठवण, वाहतूक, पतपुरवठा, शेतमाल बाजारभाव या खऱ्या अडचणी आहेत. परंतु, त्यासाठी या अर्थसंकल्पात ठोस तरतूद दिसत नाही. मोदी सरकारनं मोठ्या खुबीनं ग्रामीण जनतेतला अंसतोष कमी करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. गेल्याच महिन्यात खतांच्या किंमतीत वाढ करण्यात आली. शेतकऱ्यांना वर्षाकाठी लागणारी खतं पाहिली तर त्याच्या खर्चात अगोदरच तीन-चार हजारांनी वाढ झाली आहे. आता वर्षाला सहा हजार रुपये मिळणार म्हणजे प्रत्यक्षात दोन-तीन हजार रुपयेच पदरी पडणार. शेतकऱ्यांच्या कुटुंबातील मतांची संख्या पाहिली, तर दीड हजार रुपयांना एक मत विकत घेतल्याचाच हा प्रकार म्हणावा लागेल.

दोन हेक्टरपर्यंत शेतजमीन असणाऱ्या शेतकऱ्यांच्या खात्यात सरकार वर्षाला सहा हजार रुपये जमा करणार आहे. तीन टप्प्यांमध्ये ही रक्कम शेतकऱ्यांना देण्यात येणार आहे. १२ कोटी शेतकऱ्यांना या योजनेचा फायदा होईल, असं श्री. गोयल यांनी सांगितलं. १ डिसेंबर २०१८ पासून या योजनेची अंमलबजावणी गृहीत धरली जाणार असून ३१ मार्च २०१९ पूर्वी शेतकऱ्यांना पहिला हप्ता मिळणार आहे. या योजनेसाठी सरकारनं यंदा २० हजार कोटी आणि पुढच्या वर्षी ७५ हजार कोटी रुपये राखून ठेवले आहेत. निवडणुकीपूर्वी शेतकऱ्यांना खूश करण्याचा प्रयत्न सरकार करणार आहे. राहुल गांधी यांनी लोकसभा निवडणुकीनंतर आपण सत्तेत आल्यास किमान उत्पन्न हमी योजना सुरू करण्याचा दावा केला होता. सरकारने त्यापुढे जाऊन शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याचा सूर पुन्हा आळवला. विशेष म्हणजे संसदेच्या गेल्या अधिवेशनात मंत्र्यांनी दिलेल्या लेखी माहितीत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्यासाठी कोणतीही योजना विचाराधीन नाही, असं सांगण्यात आलं होतं.

पंतप्रधान मोदी यांनी यापूर्वी वारंवार शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ करण्याचं केलेलं वक्तव्य, सरकारनं संसदेत दिलेलं उत्तर आणि आता हंगामी अर्थमंत्री पियूष गोयल यांनी शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करण्याबाबत केलेलं भाष्य यापैकी काय खरं मानायचं, असा संभ्रम पडतो. ‘शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करणार’ या फसव्या घोषणेचा पुनरुच्चार गोयल यांनी पुन्हा भाषणात केला. मोदी सरकारच्या साडेचार वर्षांमधील सरासरी कृषी विकासदर फक्त १.९ टक्के आहे. १९९१ पासूनच्या इतर कोणत्याही सरकारच्या तुलनेत मोदी सरकारच्या कालावधीतला कृषी विकासदर सर्वात नीचांकी आहे. सामान्यत: सात वर्षांमध्ये उत्पन्न दुप्पट करायचं असल्यास कृषी विकासदर किमान ११ टक्के असणं आवश्यक आहे. हे साधं गणित असताना मोदी सरकार २०२२ पर्यंत शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट करणार असं सांगून शेतकऱ्यांना भुलवत आहे. शेतकरी सन्मान योजनेतली एक अडचण म्हणजे योजनेसाठी पात्र कोण आणि अपात्र कोण, हे ठरवावं लागणार आहे. एक तर देशभरातील मोठ्या प्रमाणातील जमिनीच्या नोंदी विश्वसनीय नाहीत. दुसरा प्रश्न म्हणजे या योजनेसाठीचा पैसा कुठून येणार, याचं उत्तर मिळत नाही. अर्थशास्त्रात कोणतंही जेवण फुकट मिळत नाही, कुणाला तरी त्याचं बील भराव लागतं, असा सिध्दांत आहे. आता मध्यमवर्गावर सवलतींचा मारा केला असला तरी यापुढे त्यांच्याच खिशात हात घालून हा खर्च भागवला जाण्याची शक्यता आहे. जूनमध्ये मांडण्यात येणाऱ्या अर्थसंकल्पात त्याची चुणूक दिसेल.

गोयल यांनी असंघटित क्षेत्रातल्या कर्मचाऱ्यांसाठी पेन्शन योजना जाहीर केली. ४२ कोटी जणांना या योजनेचा लाभ होईल. १५ हजार रुपयांपर्यंत पगार असलेल्या असंघटित क्षेत्रातल्या ६० वर्षांवरील कामगारांना सरकार दरमहा तीन हजार रुपये पेन्शन देणार आहे. वयाच्या अठराव्या वर्षी ही या योजनेत समाविष्ट होणाऱ्या असंघटित क्षेत्रातल्या कामगाराला दरमहा ५५ रुपये बचत करावे लागतील. सरकारही इतकेच पैसे बचत करेल, अशी ही समभागी स्वरूपाची योजना आहे. या योजनेच्या अंमलबजावणीतही अडचणी येणार आहेत. असंघटित क्षेत्रातल्या बहुसंख्य कामगारांना महिन्याचा पगार रोखीनं मिळतो. तसंच त्यांचं उत्पन्नही बदलत राहतं. या परिस्थितीत संबंधित कर्मचारी पात्र आहे की नाही, हे सरकार कसं ठरवणार, हा प्रश्न आहे. राजकीयदृष्ट्या घोषणा करण्यासाठी ही चांगली योजना असली तरी आर्थिकदृष्ट्या चोख अंमलबजावणी करण्यासाठी बऱ्याच समस्यांना सामोरं जावं लागणार आहे. २०१४ मध्ये मोदी यांनी निवडणूक प्रचाराच्या वेळी उज्वल भारताची आशा जागवली होती. ‘अच्छे दिन आने वाले हैं’, अशी त्यांच्या प्रचाराची लाईन होती. मोदींनी रोजगारनिर्मितीचं वचन दिलं होतं आणि ‘मिनिमम गव्हर्न्मेंट, मॅक्झिमम गव्हर्नन्स’ ची कल्पना मांडली होती; परंतु पाच वर्षांनंतरही ‘अच्छे दिन’ ही केवळ एक निवडणूक घोषणाच बनून राहिली. देशातल्या बेरोजगारीचा सध्याचा दर हा गेल्या ४५ वर्षांमधील सर्वाधिक आहे. यामागे नोटाबंदी आणि जीएसटीच्या अंमलबजावणीतील अडचणी असल्याचं सांगितलं जात आहे.

अर्थवेध

आज तरुणांमधल्या बेरोजगारीचा दर १३ ते २७ टक्क्यांच्या दरम्यान आहे. त्यामुळे देशातल्या कोट्यवधी तरुणांचं भविष्य अधांतरी आहे. देशातल्या उद्योजकांच्या संघटनेनं भारताच्या बेरोजगारीचा दर ७.८ टक्के इतका वाढला आहे, असं म्हटलं होतं. ‘द सेंटर फॉर इंडियन इकॉनॉमी’नं २०१८ मध्ये जवळपास १.१ कोटी भारतीयांना नोकरीतून काढून टाकण्यात आलं, असा अहवाल दिला आहे. अधिक रोजगारनिर्मितीची कोणतीही संकल्पना सरकारनं या अर्थसंकल्पात मांडली नाही. आपल्या संपूर्ण भाषणात देशात मुबलक प्रमाणात नोकऱ्या उपलब्ध होणार आहेत, असं आश्वासन गोयल यांनी दिलं. पण हे कसं साध्य करणार, हा खरा प्रश्न आहे? मेक इन इंडिया, स्टार्ट अप इंडिया आदी योजनांचा आणि थेट परकीय गुंतवणूक वाढल्याचा परिणाम रोजगारवाढीत दिसायला हवा होता. तो दिसत नाही. पकोडे तळून, गाई चारून रोजगार मिळतो, असं सरकारमधील उच्चपदस्थच सांगायला लागल्यानं देशातले तरुण अशा घोषणांच्या पावसात भिजण्याचं पसंत करतील का, याबाबत साशंकता आहे.

कोणत्याही सरकारचा अर्थसंकल्प सर्वांना खूश करणारा कधीच नसतो. देशात दुष्काळी परिस्थिती असली तरी या अर्थसंकल्पात घोषणांचा पाऊस पाडण्यात आला आहे. कोणतंही सरकार असतं, तरी हेच केलं गेलं असतं, हे ही मान्य आहे. कारण निवडणुकीला सामोरं जाताना प्रत्येक सरकारची ‘होऊ दे खर्च’ हीच भूमिका असते. मात्र, घोषणाबाजी करताना उद्या हे आपल्या अंगाशी येणार नाही याबाबत खात्री बाळगायला हवी.

या पॉलिसीही हव्या...

जीवन, आरोग्य आणि वाहन हे विम्याचे मुख्य प्रकार मानले जातात. आर्थिक वर्ष संपत असल्याने करबचतीचं उद्दिष्ट समोर ठेऊन करदाते विमा पॉलिसी खरेदी करतात. पण प्रत्यक्षात विमा पॉलिसीचा आवाका यापेक्षा खूप मोठा आहे. विमाधारकाला आर्थिक संरक्षण देणं हा विम्याचा मुख्य उद्देश. त्यामुळे करदात्यांनी विमा काढताना ही बाब लक्षात ठेवायला हवी. विम्याच्या मुख्य प्रकारांसोबतच फारशा प्रचलित नसलेल्या पॉलिसीही सध्याच्या काळात गरजेच्या आहेत. विम्याच्या इतर काही पर्यायांवर नजर टाकू या.

INSURANCE POLICY
AUTO
HOME
LIFE
MEDICAL

विमा जगत

राहत्या घराचा विमा काढून घ्यायला हवा. स्वत:चं घर ही सर्वसामान्यांची अत्यंत मौल्यवान मालमत्ता. नैसर्गिक आपत्ती तसंच इतर काही कारणांमुळे घराचं नुकसान झालं तर गृह विम्याचं संरक्षण मिळू शकतं. घरमालकासोबत भाडेकरूही राहत्या घराचा विमा काढू शकतो. लग्नावर होणारा प्रचंड खर्च पाहता विविध कंपन्यांनी या सोहळ्याला विमा संरक्षण देणाऱ्या पॉलिसी सादर केल्या आहेत. कोणत्याही अप्रिय घटनेमुळे लग्न रद्द करण्याची किंवा पुढे ढकलण्याची वेळ आली तर होणारं आर्थिक नुकसान विमा पॉलिसीमुळे टळतं.

क्रेडिट, डेबिट कार्डांशी संबंधित गैरप्रकार पाहता अशा कार्डांच्या संरक्षण योजनांचा लाभ घ्यायला हवा. या योजनांमुळे तुम्हाला आर्थिक संरक्षणासोबत इतर सुविधाही मिळतात.

अशी पूर्ण करा उद्दिष्ट

पालक मुलांचं भवितव्य घडवण्यासाठी झटत असतात. त्यांचं शिक्षण, लग्न तसंच इतर गरजांसाठी आर्थिक तरतुदी कराव्या लागतात. यासाठी गरज असते ती योग्य आर्थिक नियोजनाची, गुंतवणुकीच्या सर्वोत्तम पर्यायांची. उत्पन्न वाढवणं तसंच खर्च कमी करणं हे गुंतवणूक वाढवण्याचे दोन पर्याय असले तरी आर्थिक उद्दिष्टांची विभागणी करून मगच गुंतवणुकीचे मार्ग निवडायला हवेत. समजा, तुमच्या मुलीला भविष्यात क्रिकेटपटू बनायचं असेल तर त्या दृष्टीने आर्थिक नियोजन कसं करायला हवं या बाबतचं मार्गदर्शन...

अर्थचित्र

प्रशिक्षणाचं वार्षिक शुल्क, क्रिकेटच्या सामग्रीसाठीचा खर्च ही लघुकालीन उद्दिष्ट्यं आहेत. एक ते पाच वर्षांपर्यंतची उद्दिष्ट्यं लघुकालीन मानली जातात. तसंच असे खर्च दरवर्षी नियमितपणे करावे लागतात. यासाठी लिक्विड तसंच लघुकालीन डेब्ट फंडांसारखे पर्याय निवडावेत. या फंडांमुळे तुम्ही वारंवार उद्‍भवणाऱ्या खर्चांची तजवीज करू शकता. तसंच यातून अतिरिक्त परतावाही मिळतो. या फंडांमधून मिळणारा परतावा सर्वसाधारणपणे बराच जास्त असतो.

यानंतर मध्यकालीन म्हणजे पाच ते दहा वर्षांच्या उद्दिष्ट्यांचा विचार करायला हवा. यात मुलीची प्रशिक्षण शिबिरं, सहली, दौरे यासाठी होणाऱ्या खर्चांचा समावेश होतो. यासह निवृत्तीसाठीच्या निधीची तजवीज करायला सुरूवात करावी लागते. मध्यकालीन इक्विटी फंड किंवा ‘इक्विटी लिंक्ड सेव्हिंग स्कीम्स’ (ईएलएसएस) मध्ये गुंतवणूक करून तुम्ही ही उद्दिष्ट्यं पूर्ण करू शकता. मध्यकालीन फंडांमधून वर्षाला ८.५ ते नऊ टक्के परतावा मिळतो.

दहा वर्षांच्या पुढच्या उद्दिष्टांसाठीच्या तरतुदीलाही लवकरच सुरूवात करायला हवी. यासाठी ‘इंडेक्स फंडां’ची निवड करा. इक्विटीवर आधारित म्युच्युअल फंडांमध्ये थेट गुंतवणूक करता येईल. यासोबतच कॉलेजचं शुल्क तसंच मुलीच्या इतर गरजा लक्षात घेऊन हायब्रिड फंडाचा विचार करता येईल. ‘सिस्टीमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन’(सिप)च्या माध्यमातूनही तुम्ही ही उद्दिष्ट्यं पूर्ण करू शकता. लग्नाप्रसंगी उभ्या करावयाच्या दृष्टीने तुम्ही सुकन्या समृद्धी योजनेचा विचार करू शकता.

खर्चाला घाला आळा

‘रिवॉर्ड पॉईंट्स’ किंवा इतर लाभ मिळवण्यासाठी क्रेडिट कार्डचा अतिवापर तुमच्या अडचणी वाढवू शकतो. नोटाबंदीनंतर सर्वसामान्यांच्या प्रत्येक आर्थिक व्यवहारावर आयकर विभागाचं बारीक लक्ष असल्याने क्रेडिट कार्डच्या माध्यमातून मर्यादित प्रमाणात खर्च करायला हवा. अनावधानाने केले जाणारे व्यवहार तुमची डोकेदुखी कशी वाढवू शकतात हे एका उदाहरणाद्वारे समजून घेऊ.

श्रीनगरहून दिल्लीला आलेल्या आदिबला २००९ मध्ये २५ हजार रुपये पगाराची नोकरी मिळाली. आर्थिक वर्ष २००९-१० मधले सात महिने त्याने नोकरी केली. दिल्लीत भाड्याने राहणाऱ्या आदिबचं उत्पन्न त्या वेळच्या कररचनेनुसार करपात्र नव्हतं. सुरूवातीच्या काळात आदिबला कुटुंबाकडून आर्थिक मदत मिळायची. ‘रिवॉर्ड पॉईंट्स’ मिळवण्याच्या नादात त्याने स्वत:सोबतच मित्रांचे खर्च भागवण्यासाठी क्रेडिट कार्डचा बेसुमार वापर केला. यामुळे त्या आर्थिक वर्षात त्याच्या क्रेडिट कार्डचं बिल दोन लाख रुपयांच्या घरात गेलं.

प्लास्टिक मनी

आर्थिक वर्ष २००९-१० चं आयकर विवरणपत्र भरलं नसल्याबद्दल आदिबला २०१३ मध्ये आयकर विभागाची नोटिस मिळाली. त्या आर्थिक वर्षात क्रेडिट कार्डचं बिल दोन लाख रुपयांच्या घरात गेल्याचं कारण यासाठी देण्यात आलं. पण त्या काळात पालकांकडून मिळणाऱ्या पैशातून क्रेडिट कार्डाचं बिलं भरत असल्याचं स्पष्टीकरण आदिबने दिलं.

पालकांकडून मुलांना मिळणारे पैसे उत्पन्न किंवा करपात्र भेटवस्तू म्हणून गणले जात नसल्याने आयकर विभागाने हे प्रकरण तिथेच मिटवलं. पण यामुळे ‘रिवॉर्ड पॉईंट्स’, ‘कॅश बॅक’ला भुलून क्रेडिट कार्डचा अतिवापर न करण्याचा धडा आदिबला मिळाला. या प्रकरणातून आपणही धडा घेणं गरजेचं आहे.

कर भरावा लागू नये म्हणून...

नुकत्याच सादर झालेल्या केंद्रिय अंतरिम अर्थसंकल्पाने सर्वसामान्य करदात्यांना मोठा दिलासा दिला. पाच लाख रुपयांपर्यंतचं उत्पन्न करमुक्त करण्यात आलं. आयकर कायद्यातल्या विविध कलमांअंतर्गत मिळणाऱ्या सवलतींचा वापर करून एकूण ७.७५ लाख रुपये उत्पन्न असलेले करदाते (ग्रॉस टोटल इन्कम) आपलं एकूण वार्षिक उत्पन्न पाच लाख रुपयांपर्यंत आणू शकतात. यामुळे आर्थिक वर्ष २०१९-२० साठी त्यांना कोणताही कर भरावा लागणार नाही. चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत पुढच्या आर्थिक वर्षात हे करदाते १५,०८० रूपये कर वाचवू शकतात. या करबचतीसाठी नेमकं काय करायला हवं याविषयी...

TAX
deduction

अर्थनियोजन

आर्थिक वर्ष २०१९-२० साठी कर भरताना सर्वात आधी तुम्ही ५० हजार रुपयांचं ‘स्टँडर्ड डिडक्शन’ मिळवू शकता. अंतरिम बजेटमध्ये ‘स्टँडर्ड डिडक्शन’मध्ये दहा हजार रुपयांची वाढ करण्यात आली.

आयकर कायद्यातल्या कलम ‘८० सी’ नुसार विविध पर्यायांमध्ये दीड लाख रुपये गुंतवून करसवलत मिळवता येईल किंवा मुलांच्या शिकवणीसाठी भरलेल्या शुल्कासाठी एकूण उत्पन्नातून तेवढ्याच रकमेच्या सवलतीसाठी दावा करता येतो. ७.७५ लाख रुपयांच्या उत्पन्नातून दीड लाख रुपये वजा केले की तुमचं उत्पन्न ६.२५ लाख रुपयांपर्यंत खाली येईल. यानंतर कलम ‘८०सीसीडी(१ बी)’ अंतर्गत ‘नॅशनल पेन्शन स्कीम’मध्ये ५० हजार रुपयांची गुंतवणूक करा. आरोग्य विम्याचा २५ हजार रुपये हप्ता भरून कलम ‘८० डी’ अंतर्गत तेवढ्या रकमेची सवलत मिळवता येईल. ज्येष्ठ नागरिक असलेल्या पालकांच्या आरोग्य विम्याच्या हप्त्यासाठी जास्तीची सवलत मिळेल. व्याज म्हणून मिळणाऱ्या दहा हजार रुपयांच्या उत्पन्नासाठीही कलम ‘८० टीटीए’ अंतर्गत सवलत मिळवता येईल.

हिंदुस्थान

वलयांकित

बुधवार, दि. १३ फेब्रुवारी २०१९

गॉसिप कॉर्नर

● [illegible]

● [illegible]

● [illegible]

भरभरून जगले!

[illegible]

अ [illegible]

कंगनाने घेतलाय पंगा!

अ [illegible]

[illegible]

'मणिकर्णिका' छोट्या पडद्यावर

भा [illegible]

'लकी'चे वेधलं लक्ष

गे [illegible]

स्टाईल फॉर्मल सूटची...

[illegible]

स [illegible]

पाचव्या आठवड्यातही वरचढ!

'उ [illegible]

रंगात रंगलेलं घर

[illegible]

दि [illegible]